महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.: मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०० दि. १४ /०१ / २०२०

**विषय :** राज्य शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै, २०१९ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय क्र. मभवा-१३१९/प्र.क्र.३०/सेवा-९ दि. ०४.०१.२०२०.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितमधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा-१३१९/प्र.क्र.३०/सेवा-९ दि. ०४.०१.२०२० अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जुलै, २०१९ पासून सुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्याचा दर १२% वरून १७% केला आहे तसेच सदर शासन निर्णयाद्वारे हा सुधारीत दर दि. ०१ डिसेंबर, २०१९ पासून देय करण्यात आला असून दिनांक ०१ जुलै, २०१९ ते दि. ३० नोव्हेंबर, २०१९ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत शासनामार्फत स्वतंत्रपणे आदेश पारित करण्यात येणार आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं. मर्यादितमधील सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेला महागाई भत्त्याचा दर १२% ऐवजी १७% असा दिनांक ०१ जुलै, २०१९, पासून सुधारीत करण्याकरीता मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प), आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे. या अनुषंगाने सदर सुधारित महागाई भत्त्याचा दर दिनांक ०१ डिसेंबर, २०१९ पासून लागू करण्यात यावा व माहे डिसेंबर २०१९ ची महागाई भत्त्यापोटीच्या फरकाची रक्कम माहे जानेवारी २०२० च्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

४. उपरोक्त सुधारीत दराने द्यावयाच्या दि. ०१ जुलै, २०१९ ते दि. ३० नोव्हेंबर, २०१९ या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या E-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

14/1

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)